सन १९५१ चा महाराष्ट्र पोलीस अधिनियम कमांक २२ चे कलम ३३ (१)(प) अन्वयेचा मनाई आदेश.

---

१) भारत निवडणूक आयोग यांचेकडील दिनांक:- १५/१०/२०२४ रोजीचे प्रेस नोटनुसार.
२) जा.क.वि.शा./ निवडणुक/मनाई आदेश/ ७६ /२०२४, दिनांक:- १५ /१०/२०२४

आदेश:-

ज्या अर्थी उपोद्घातातील अ.क. १ मधील अधिसूचनेनुसार भारत निवडणूक आयोगाने, महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ कार्यक्रम जाहीर केलेला असून दिनांक १५/१०/२०२४ रोजीपासून आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे. ठाणे शहर आयुक्तालयातील १४ विधानसभा मतदारसंघात दिनांक २०/११/२०२४ रोजी मतदान व दिनांक २३/११/२०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होणार आहे. निवडणूकीच्या अनुषंगाने ठाणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये १३४ - भिवंडी ग्रामीण, १३६ - भिवंडी पश्चिम, १३७ - भिवंडी पुर्व, १३८ - कल्याण पश्चिम, १३९ - मुरबाड, १४० - अंबरनाथ, १४१ -उल्हासनगर, १४२ - कल्याण पुर्व, १४३ - डोबिंवली, १४४ - कल्याण ग्रामीण, १४६ - ओवळा माजिवडा, १४७ - कोपरी पाचपाखाडी, १४८ - ठाणे, १४९ - मुंब्रा कळवा मतदार संघ असे एकूण १४ विधानसभा मतदारसंघ येतात.

सदर निवडणुकीच्या अनुषंगाने विविध राजकीय पक्ष प्रचारासाठी झेंडे उभारणे, बॅनर्स, कापडी फलक, पोस्टर लावणे, नोटीसा चिटकविणे, घोषणा लिहीणे, कमान, पताका, कटआउट लावणे किंवा चिन्हे वापरतात, त्यामुळे अनेक वेळा दोऱ्या, काठया व तत्सम भाग रस्त्यावर आडवा येऊन रहदारीस अडथळा निर्माण होतो. ज्याअर्थी प्रचाराचे कालावधीत अशा किरकोळ कारणावरून पक्ष कार्यकर्त्यांमध्ये असंतोषाचे वातावरण व वाद निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो व शांततेचा भंग होऊ शकतो.

त्या अर्थी ठाणे पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस स्टेशन हद्दीत निवडणुकीच्या अनुषंगाने जनजीवन सुरळीत राहण्यासाठी सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था जोपासण्यासाठी तसेच कोणत्याही प्रकारचा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवून सामाजिक तेढ निर्माण होवू नये म्हणुन मी ' मीना मकवाणा ' पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांना सन १९५१ चा महाराष्ट्र पोलीस अधिनियम कमांक २२ चे कलम ३३ (१)(प) अन्वये आम्हास प्रदान करण्यात आलेले अधिकार त्यांनी कार्यालयीन आदेश क्र.CP/SB/ORDERS/76(A)/2024, दिनांक ११/०३/२०२४ अन्वये त्या अधिकाराचा वापर करून ठाणे पोलीस आयुक्तालयातील निवडणूक कार्यक्षेत्रात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१, कमांक २२ चे कलम ३३ (१)(प) अन्वये रहदारीस अडथळा होईल किंवा उजेड व हवा निर्वेधपणे येण्यास प्रतिबंध होईल अशा रितीने कोणताही सार्वजनिक रस्ता व सार्वजनिक जागेवर बॅनर्स लावणे, फलक लावणे, खांबांवर झेंडे लावणे यांस या आदेशाच्या तारखेपासून निवडणूक क्षेत्रात निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंतच्या कालावधीसाठी मी प्रतिबंध करीत आहे.

सदर निवडणुकीचे काळात कोणत्याही राजकीय पक्षाच्या कोणत्याही उमेदवाराने खाजगी इमारत अथवा आवारात पोस्टर, झेंडे, बॅनर्स, कापडी फलक लावणे, नोटीसा चिटकविणे व घोषणा लिहिणे इ. वापर करावयाचा असल्यास त्यांनी प्रथम जागा मालकाची लेखी परवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच सदर पोस्टर, झेंडे, बॅनर, जाहिराती, कापडी फलक, घोषणा, नोटीसा चिटकविणे इ. यांची आवश्यकतेप्रमाणे संबधित निवडणूक निर्णय अधिकारी यांची परवानगी घेवुन संबधितांना त्याबाबतची माहिती द्यावी. सदर लेखी परवानगी संबंधित पोलीस स्टेशनला दाखवून पोलीसांचा ना हरकत दाखला घेणे देखील बंधनकारक राहील अशा रितीने खाजगी जागेवर लावलेले बॅनर्स, पोस्टर्स इ.चा रहदारीस अडथळा होणार नाही. उजेड व हवा अडवली जाणार नाही हे पाहणे त्या पक्षाच्या उमेदवाराला बंधनकारक राहील.

मी सुचना देते की, सदरहू आदेशाच्या प्रती निवडणुक क्षेत्रात सहज दिसणाऱ्या सार्वजनिक ठिकाणी चिटकवून ध्वनीक्षेपकाव्दारे सदर आदेश प्रसारीत करावा व तशा नोंदी घेण्यात याव्यात.

सदर मनाई आदेश दिनांक १५/१०/२०२४ रोजी १५:३० वा पासून ते दिनांक २३/११/२०२४ रोजी २४.०० वा पावेतो लागू राहील. सदर मनाई आदेशाचा भंग करणाऱ्या विरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम १३१ प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

सदर आदेश आज दिनांक १५/१०/२०२४ रोजी माझे सही शिक्क्यानिशी जारी केलेला आहे.

दिनांक :- १५/१०/२०२४
शिक्का

(मीना मकवाणा) 15/10/24
पोलीस उप आयुक्त,
विशेष शाखा, ठाणे शहर

Scanned with CamScanner

प्रति:-

१) व्यवस्थापक, सरकारी मुद्रणालय, वर्ली रोड, मुंबई. (राजपत्रात प्रसिध्दीसाठी)
२) सर्व पोलीस स्टेशन व शाखा प्रभारी अधिकारी, आयुक्त परिसर, ठाणे.
३) सर्व पोलीस उप आयुक्त, आयुक्त परिसर, ठाणे.
४) सर्व सहा.पोलीस आयुक्त, आयुक्त परिसर ठाणे.
५) जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे.
६) समन्वय अधिकारी, ९ ए.एस.,ठाणे (पोलीस पत्रक प्रसिध्दीसाठी)

प्रत माहितीस्तव अग्रेषित :-

१) पोलीस सह आयुक्त, ठाणे.
२) अपर पोलीस आयुक्त, प्रादेशिक विभाग,पश्चिम ठाणे, पुर्व कल्याण, गुन्हे व प्रशासन.
३) जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, ठाणे.
४) निवडणुक निर्णय अधिकारी,
   १) १३४ - भिवंडी ग्रामीण , मतदार संघ.
   २) १३६ - भिवंडी पश्चिम, मतदार संघ.
   ३) १३७ - भिवंडी पुर्व, मतदार संघ.
   ४) १३८ - कल्याण पश्चिम, मतदार संघ.
   ५) १३९ - मुरबाड, मतदार संघ.
   ६) १४० - अंबरनाथ, मतदार संघ.
   ७) १४१ - उल्हासनगर, मतदार संघ.
   ८) १४२ - कल्याण पुर्व, मतदार संघ.
   ९) १४३ - डोबिंवली, मतदार संघ.
   १०) १४४ - कल्याण ग्रामीण, मतदार संघ.
   ११) १४६ - ओवळा माजिवडा, मतदार संघ.
   १२) १४७ - कोपरी पाचपाखाडी, मतदार संघ.
   १३) १४८ - ठाणे, मतदार संघ.
   १४) १४९ - मुंब्रा कळवा, मतदार संघ.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

१) अपर मुख्य सचिव, गृहविभाग, मत्रांलय, महाराष्ट्र राज्य मुंबई
२) आयुक्त, राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुबंई

Scanned with CamScanner